सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १८६३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५

# गॅस कंपनी अधिनियम, १८६३

(दिनांक १३ नोव्हेंबर,२००६ पर्यंत सुधारित)

## BOMBAY ACT No. V OF 1863

# THE GAS COMPANIES ACT, 1863

**(As modified upto 13th November, 2006)**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ०३४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[ किंमत : ६.२० रुपये ]

S (H) 730

# Gas Companies Act, 1863

## सन १८६३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५

## गॅस कंपनी अधिनियम, १८६३

### अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| प्रस्तावना | | १ |
| कलमे | | |
| १. | देखरेखीखाली सडका वगैरे तोडण्याचा आणि गटारे उघडण्याचा अधिकार | २ |
| २. | संमतीशिवाय खाजगी जमिनीवर प्रवेश न करणे ... | २ |
| ३. | सडका तोडण्यापूर्वी किंवा गटार उघडण्यापूर्वी, नियंत्रण वगैरे असणाऱ्या व्यक्तीस नोटीस देणे. | ३ |
| ४. | सडका किंवा गटारे ही, त्यावर नियंत्रण असणाऱ्या व्यक्तींच्या देखरेखीखेरीज तोडता कामा नये. | ३ |
| | नियंत्रण वगैरे असणाऱ्या व्यक्ती जर देखरेख करण्यात कसूर करतील तर कंपनीने काम सुरू करणे. | ३ |
| ५. | तोडण्यात आलेल्या सडका कोणताही विलंब न करता पूर्वावस्थेत आणणे .. | ४ |
| ६. | नोटिशीशीवाय सडक उघडल्याबद्दल किंवा तोडल्याबद्दल शास्ती .. | ४ |
| ७. | विलंब केल्याचे बाबतीत संबंधित व्यक्तीस (रस्ता इत्यादी) पूर्वावस्थेत आणण्याचा व खर्च वसूल करण्याचा अधिकार असणे. खर्च कसे निश्चित करावयाचे आणि वसूल करावयाचे ते. | ४ |
| ८. | वापरलेल्या गॅसचे प्रमाण निश्चित करण्यासाठी इमारतीत प्रवेश करण्याचा अधिकार. | ५ |
| ९. | [ रद्द करण्यात आले ] ... | ५ |
| १०. | [ रद्द करण्यात आले ] ... | ५ |
| ११. | वसूल होणे असलेल्या भाड्याबद्दल मापयंत्र वगैरे जप्त न करणे ... | ५ |
| १२. | लबाडीने गॅसचा उपयोग केल्याबद्दल शास्ती ... | ६ |
| १३. | नलिकेस जाणूनबुजून नुकसान पोहचविल्याबद्दल शास्ती ... | ६ |
| १४. | अपघातामुळे नुकसान केलेल्या नलिकेबद्दल मोबदला ... | ६ |
| १५. | पाणी दूषित करविल्याबद्दल शास्ती ... | ६ |
| | अपराध चालू असताना प्रत्येक दिवसासाठी शास्ती ... | ७ |
| १६. | नोटीस दिल्यानंतर गॅस जाऊ दिल्याबद्दल त्या प्रत्येक दिवसासाठी शास्ती | ७ |

## अनुक्रमणिका--चालू


१७. जर गॅसमुळे पाणी दूषित झाले तर त्याबद्दल शास्ती ... ७

१८. पाणी दूषित झाल्याचे कारण निश्चित करण्यासाठी गॅसच्या नलिकांची तपासणी करण्याचा अधिकार. ७

१९. खर्च कोणी करावयाचा ... ८

२०. खर्च कसा निश्चित करावयाचा ... ८

२१. उपद्रवाबद्दलच्या आरोपास जबाबदार ठरविणे ... ८

२२. ज्ञापन आणि संघ नियमावली आणि विनियम इत्यादींच्या प्रती, तपासणीसाठी मुंबईतील कंपनीच्या कार्यालयात, सचिवालयात आणि जॉईंट स्टॉक कंपन्यांच्या रजिस्ट्रारच्या कार्यालयात ठेवणे. ८

प्रत पुरावा म्हणून समजणे ... ९

२३. कंपनीवर आदेशिका बजाविणे ... ९

२४. दंड वगैरेंची वसुली ... ९

२५. जप्ती करून रक्कम वसूल करणे ... ९

२६. कोणतीही जप्ती नमुना वगैरे प्रमाणे नाही म्हणून ती अवैध ठरणार नाही १०

२७. अधिनियम, इतर जागांस व कंपनीस लागू करण्याचा अधिकार ... १०

२८. अर्थ विवरण ... १०

# सन १८६३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५[१]

## गॅस कंपनी अधिनियम, १८६३†

[ १२ मे १८६३ ]

हा अधिनियम पुढील अधिनियमान्वये अंशत: रद्द करण्यात आला :--

सन १८८६ चा मुंबई अधिनियम ३.

सन १९५० चा मुंबई अधिनियम १३..

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याअन्वये, अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत.

सन १८९५ चा अधिनियम १६.

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.

सन १९४५ चा मुंबई अधिनियम १७*

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम, ५१.

**मुंबई गॅस कंपनी, लिमिटेड, यास विवक्षित अधिकार देण्याबाबत आणि गॅस तयार करण्याच्या व त्याचा पुरवठा करण्याच्या कारणासाठी नोंदण्यात आणि संस्थापित करण्यात आलेल्या इतर कंपन्यांत तसेच अधिकार देण्यास सरकारला अधिकार देण्याबाबत अधिनियम.**

प्रस्तावना. **ज्याअर्थी,** मुंबई इलाख्यात गॅसविषयक कामे सुरू करण्याच्या कारणासाठी नुकतीच जॉईंट स्टॉक कंपनी स्थापन करण्यात आली आहे व जॉईंट स्टॉक कंपनी अधियिमन, १८५६ व १८५७ याअन्वये जी मर्यादित स्वरूपाच्या जबाबदारीसह इंग्लडमध्ये पूर्णत: नोंदण्यात आली असून तिने "मुंबई गॅस कंपनी लिमिटेड" या नावाची एक व्यक्तिभूत संस्था बनविण्यात आल्याचे प्रमाणपत्र योग्यरीतीने प्राप्त केले आहे ;

१९ व २० व्हिक्ट. सी. ४७, २० व २१ व्हिक्ट, सी, १४.

**आणि ज्याअर्थी,** उक्त कंपनी, [२][ बृहन्मुंबईत ] गॅस विषयक कामांची उभारणी करणार आहे आणि गॅस तयार करण्यासाठी व त्याचा पुरवठा करण्यासाठी उपकरणे व साहित्य तयार करण्याच्या व तसेच मुंबई इलाख्यातील गॅस-फिटर्सच्या धंद्यातील कामे करीत आहे ;

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई राजपत्र १८६३ पहा. पूरक पृ. १९९. निवड समितीच्या अहवालासाठी वरील राजपत्राचे पृ. २५५ पहा; आणि परिषदेच्या कामकाजवृत्तासाठी वरील राजपत्राची पृ. १९३ व २०१ पहा.

† मुंबई संक्षिप्त नावं अधिनियम, १९२१ (१९२१ चा मुंबई २) याद्वारे हे संक्षिप्त नाव देण्यात आले.

२. सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२ याच्या कलम २, चे परंतुक तसेच सन १९४५ चा मुंबई १७ याच्या कलम ९. अनुसूची इ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

* हा अधिनियम नव्याने अधिनियमित करण्यात आला व उक्त अधिनियमाच्या कलम ९ व अनुसूची इ द्वारे सुधारित करण्यात आला आणि तो सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२ याद्वारे नेहमीकरिता अंमलात आला आहे.

S(H)-730-1-a

**आणि ज्याअर्थी,** उक्त कंपनीला, गॅसच्या साहाय्याने [१][ बृहन्मुंबईत ] हाती घेतलेली दिवाबत्तीची कामे पार पाडता यावीत म्हणून तिला अधिकार आणि सवलती देणे इष्ट आहे व यानंतर, मुंबई इलाख्यातील व मुंबई इलाख्याच्या अंमलाखालील इतर शहरात व जागेत, उक्त कंपनीच्या कामांसाठी आणि ज्या कंपन्या गॅस तयार करण्याच्या व त्याचा पुरवठा करण्याच्या कारणांसाठी नोंदण्यात व संस्थापित करण्यात आल्या आहेत किंवा यानंतर नोंदण्यात किंवा संस्थापित करण्यात येतील अशा इतर कंपन्यांस, असे अधिकार व अशा सवलती देणे इष्ट आहे ; **त्याअर्थी** पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :--

देखरेखीखाली सडका वगैरे तोडण्याचा आणि गटारे उघडण्याचा अधिकार.

१. [१][ बृहन्मुंबईत ] आणि यानंतर या अधिनियमाची तरतूद ही [२][ [३][राज्य] शासनाच्या ] आदेशान्वये किंवा परवानगी घेऊन ज्या शहरास किंवा जागेस लागू केले जातील अशा [४][ मुंबई राज्यातील ] इतर कोणत्याही शहरात किंवा जागेत, मुंबई गॅस कंपनी, लिमिटेड, ह्या कंपनीला यानंतर निर्दिष्ट केलेल्या देखरेखीखाली, वेगवेगळ्या सडका आणि पूल यांची जमीन फरशी उघडण्याचा व तो तोडण्याचा आणि अशी सडक किंवा पूल यांतील किंवा यांखालील कोणताही नाला, गटार किंवा बोगदा उघडण्याचा आणि त्याच हद्दीत नलिका, नळ, जोडनलिका टाकण्याचा व बसविण्याचा आणि इतर कामे करण्याचा आणि त्यांची दुरुस्ती करण्याचा, तीत फेरफार करण्याचा, किंवा ती काढून टाकण्याचा अधिकार आहे आणि तसेच गॅस तयार करताना जी घाण आणि टाकाऊ द्रव पदार्थ निर्माण होतील ते वाहून नेण्यासाठी आवश्यक असतील असा कोणताही नाला तयार करण्याचा अधिकार आहे आणि उपरिनिर्दिष्ट कारणांसाठी, अशा सडका किंवा पूल यातील किंवा याखालील सर्व माती व वस्तू काढण्याचा व त्यांचा उपयोग करण्याचा अधिकार आहे.

आणि कंपनीस अशा सडका किंवा पूल यांमध्ये किंवा त्यावर कोणतेही खांब, दिवे किंवा इतर कामे उभारण्याचा आणिउक्त कंपनीस, उक्त [१][ बृहन्मुंबईच्या ] किंवा वर निर्दिष्ट केलेल्या इतर शहराच्या किंवा जागेच्या रहिवाश्यांना गॅसचा पुरवठा करण्यासाठी वेळोवेळी आवश्यक वाटतील अशी कामे करण्याचा अधिकार आहे आणि कंपनीला याअन्वये मंजूर केलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करताना तिने कमीतकमी नुकसान होईल अशा रीतीने कामे पार पाडली पाहिजेत व अशा अधिकारांची अंमलबजावणी करताना जे नुकसान होईल त्याबद्दल नुकसान भरपाई दिली पाहिजे.

संमतीशिवाय खाजगी जमिनीवर प्रवेश न करणे.

२. परंतु या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे उक्त कंपनीस जी कोणतीही इमारत किंवा जमीन सार्वजनिक उपयोगासाठी राखून ठेवण्यात आली नसेल अशा कोणत्याही इमारतीतून किंवा जमिनीतून किंवा इमारतीमधून किंवा जमिनीमधून अशा इमारतीचे किंवा जमिनीचे मालक किंवा भोगवटा करणारे यांच्या संमतीवाचून कोणताही नळ टाकण्याचा किंवा कामे करण्याचा अधिकार पोहोचतो असे समजता कामा नये ; परंतु उक्त कंपनीस, ह्या अधिनियमास अनुसरून ज्या कोणत्याही जमिनीत पूर्वीच वैधरीत्या नळ बसविण्यात किंवा टाकण्यात आला असेल त्याऐवजी तेथे कोणत्याही वेळी प्रवेश करून तेथे असलेल्या नळाऐवजी कोणताही नवीन नळ टाकण्याचा किंवा बसविण्याचा आणि अशा रीतीने टाकलेल्या कोणत्याही नळाची दुरुस्ती करण्याचा किंवा तो बदलण्याचा अधिकार आहे.

---

[१]. सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२ याच्या कलम २ चे परंतुक तसेच सन १९४५ चा मुंबई १७ याच्या कलम ९, अनुसूची इ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२]. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३]. विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४]. सन १९५८ चा मुंबई ५१ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. उक्त कंपनीने, कोणतीही सडक, पूल, नाला, गटार किंवा बोगदा खुला करण्यापूर्वी किंवा तोडण्यापूर्वी, तिने [1][ मुंबई शहराच्या बाबतीत, संबंधित स्थानिक प्राधिकाऱ्यास ] नगरपालिका कमिशनर यांस, ती सडक, पूल, नाला, गटार किंवा बोगदा ज्यांच्या नियंत्रणाखाली किंवा व्यवस्थेखाली असेल अशा इतर व्यक्तीस किंवा त्यांचे लिपिक, मोजणीदार (सर्व्हेअर) किंवा इतर अधिकारी यांस, ती सडक, पूल, नाला, गटार किंवा बोगदा खुला करण्याविषयी किंवा तोडण्याविषयी, असे काम सुरू करण्यापूर्वी तीन दिवसांपेक्षा कमी नव्हे इतक्या दिवसांची आपल्या उद्देशांची नोटीस दिली पाहिजे, परंतु कोणत्याही नळात किंवा इतर कामात उणीव असल्यामुळे निकडीची परिस्थिती उद्‌भवल्यास अशी नोटीस देणे आवश्यक असणार नाही ; परंतु अशी कामे सुरू करण्यात आल्यावर ताबडतोब व आवश्यक वाटेल त्यावेळी अशी नोटीस देण्यात आली पाहिजे.

सडका तोडण्यापूर्वी किंवा गटार उघडण्यापूर्वी, नियंत्रण वगैरे असणाऱ्या व्यक्तीस नोटीस देणे.

४. अशी कोणतीही सडक, पूल, नाला, गटार किंवा बोगदा ही वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे निकडीच्या परिस्थितीखेरीज करून, त्यावर नियंत्रण असणाऱ्या किंवा त्याची व्यवस्था पाहणाऱ्या व्यक्तींच्या किंवा त्यांच्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखेरीज उघडता किंवा तोडता कामा नये आणि असे इसम किंवा त्यांचे अधिकारी यांनी जी योजना पसंत केली असेल त्या योजनेप्रमाणे किंवा अशी योजना मान्य करण्याबद्दल कोणताही वाद निर्माण झाल्यास, फौजदारी न्यायाधीश जी योजना ठरवील त्या योजनेप्रमाणे अशी सडक, पूल, नाला, गटार किंवा बोगदा उघडण्यात किंवा तोडण्यात आला पाहिजे. आणि फौजदारी न्यायाधीशास, असा कोणताही नाला किंवा गटार यावर नियंत्रण असणाऱ्या किंवा त्याची व्यवस्था पाहणाऱ्या व्यक्तींच्या किंवा त्यांच्या अधिकाऱ्याच्या अर्जावरून, असे कोणतेही काम चालू असताना असा कोणताही नाला किंवा गटार यावर अडथळा निर्माण करील अशा गटाराच्या कोणत्याही अडथळ्यापासून संरक्षण करण्यासाठी त्यांस आवश्यक वाटेल अशी तात्पुरत्या स्वरूपाची किंवा इतर कामे, उक्त कंपनीस, करण्यास भाग पाडण्याचा अधिकार आहे;

सडका किंवा गटारे ही, त्यावर नियंत्रण असणाऱ्या व्यक्तींच्या देखरेखीखेरीज तोडता कामा नये.

परंतु, नेहमी असे की, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे असे नियंत्रण असणाऱ्या किंवा व्यवस्था पाहणाऱ्या व्यक्ती आणि त्यांचा अधिकारी वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे उक्त कंपनीच्या इराद्याची अशी नोटीस मिळाल्यानंतर, अशी कोणतीही सडक, पूल, नाला, गटार किंवा बोगदा उघडण्यासाठी ठरविलेल्या वेळी हजर राहण्यात कसूर करतील, किंवा ते उघडण्यासाठी किंवा तोडण्यासाठी कोणतीही योजना सुचविणार नाहीत किंवा कामावर देखरेख करण्यात हयगय करतील तर उक्त कंपनीस, अशा व्यक्तींच्या किंवा त्याच्या अधिकाऱ्याच्या देखरेखीशिवाय, अशा नोटिशीत निर्दिष्ट केलेले काम पार पाडण्याचा अधिकार आहे.

नियंत्रण वगैरे असणाऱ्या व्यक्ती जर देखरेख करण्यात कसूर करतील तर कंपनीने काम सुरू करणे.

---

१. सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२ याच्या कलम २, चे परंतुक तसेच सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ९, अनुसूची इ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

तोडण्यात आलेल्या सडका कोणताही विलंब न करता पूर्वावस्थेत आणणे.

५. जेव्हा उक्त कंपनी कोणत्याही सडकेवरील किंवा पुलावरील रस्ता किंवा फरशी किंवा कोणताही नाला, गटार किंवा बोगदा खुला करील किंवा तोडून टाकील, तेव्हा, तिने ज्या कामासाठी ती तोडण्यात किंवा उघडण्यात आली ते काम शक्यतो लवकर संपविले पाहिजे आणि जमीन भरून काढली पाहिजे आणि अशारीतीने उघडलेला किंवा तोडलेला रस्ता, फरशी किंवा नाला, गटार किंवा बोगदा पूर्वावस्थेत आणला पाहिजे आणि त्या कामामुळे निर्माण झालेला केरकचरा काढून नेला पाहिजे ; आणि असा रस्ता किंवा फरशी असा खुला करण्यात किंवा तोडण्यात आला असेल त्या सर्व वेळी, त्या भोवती कुंपण घातले पाहिजे व त्यापासून संरक्षणाची तरतूद केली पाहिजे आणि ज्या ठिकाणी असा रस्ता किंवा फरशी उघडण्यात किंवा तोडण्यात येईल अशा रस्त्याजवळ किंवा फरशीजवळ किंवा त्याचेसमोर येणाऱ्याजाणाऱ्या लोकांस पुरेशी सावधगिरीची सूचना म्हणून, असा रस्ता किंवा फरशी रात्रीच्या वेळी खुली किंवा तोडलेल्या अवस्थेत राहील त्या प्रत्येक रात्रीच्या वेळी, दिवा लावला पाहिजे आणि जो अशा रीतीने खुला करण्यात किंवा तोडण्यात आला असेल असा रस्ता किंवा फरशी ही, ती परत बसवून सुधारण्यात आल्यानंतर, तीन महिनेपर्यंत चांगल्या स्थितीत ठेवली पाहिजे.

नोटिसी-शिवाय सडक उघडल्याबद्दल किंवा तोडल्याबद्दल शास्ति.

६. जर उक्त कंपनी, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे सूचना दिल्याशिवाय, किंवा वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे जी कोणतीही रीत मान्य करण्यात किंवा ठरविण्यात आली असेल त्या रीतीपेक्षा निराळ्या रीतीने किंवा वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे तिला तात्पुरत्या स्वरूपाची किंवा इतर कामे करण्यात भाग पाडले असता ती न करता यात कंपनीस जी कोणतीही कामे देखरेखीशिवाय किंवा नोटीस न देता करण्याचा अधिकार आहे त्या कामाचा समावेश होत नाही--कोणतीही सडक किंवा पूल किंवा कोणताही नाला, गटार किंवा बोगदा खुला करील किंवा तोडील तर, अथवा जर उक्त कंपनी असे कोणतेही काम पुरे करण्यात किंवा जमीन भरून काढण्यात किंवा अशारीतीने खुला केलेला किंवा तोडलेला रस्ता किंवा फरशी किंवा नाला, गटार किंवा बोगदा भरून काढण्यास आणि तो पूर्वावस्थेत आणण्यात किंवा त्या कामामुळे निर्माण झालेला केरकचरा काढून नेण्यात कोणताही विलंब लावील तर, अथवा जेथे असा रस्ता किंवा फरशी तोडण्यात आली आहे तेथे कुंपण घालण्यास, त्यापासून संरक्षण होण्यासाठी तरतूद करण्यास व दिवाबत्ती करण्यास हयगय करील किंवा असा रस्ता किंवा फरशी पूर्वीप्रमाणे सुस्थितीत आणल्यानंतर तीन महिने मुदतीपर्यंत ती चांगल्या स्थितीत ठेवण्यात हयगय करील, तर अशी कसुरी, जी सडक, पूल, नाला, गटार किंवा बोगदा याबाबत घडली असेल त्यांवर नियंत्रण ठेवणाऱ्या किंवा त्यांची व्यवस्था पाहणाऱ्या व्यक्तीकडे कंपनीने, अशा प्रत्येक अपराधादाखल पराकाष्ठा पन्नास रुपये जमा केले पाहिजेत आणि तिने त्याबद्दलची नोटीस मिळाल्यानंतर वर निर्दिष्ट केल्याप्रमाणेचा असा कोणताही विलंब करणे हे ज्या मुदतीपर्यंत चालू ठेवण्यात आले त्या प्रत्येक दिवसासाठी आणखी, पराकाष्ठा पन्नास रुपये जमा केले पाहिजेत.

विलंब केल्याचे बाबतीत संबंधित.

७. वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे असा कोणताही विलंब किंवा कसुरी झाली असेल तर, असा विलंब किंवा कसुरी ज्याबाबतीत झाली आहे अशी सडक, पूल, नाला, गटार किंवा बोगदा यांवर नियंत्रण असणाऱ्या किंवा त्यांची व्यवस्था पाहणाऱ्या इसमास अशा रीतीने लांबणीवर टाकलेले किंवा जे काम करण्यात कसुरी झाली आहे असे काम करवून घेण्याचा अधिकार आहे आणि ते करण्याचा

खर्च, कंपनीने, अशा व्यक्तीस दिला पाहिजे ; आणि अशा खर्चाचे रकमेबद्दल कोणताही वाद उत्पन्न झाल्याचे बाबतीत अशी खर्चाची रक्कम ही [१][ बृहन्मुंबईत ] आणि [२][ मुंबई येथील उच्च न्यायाधिकरणाच्या ] अधिकारक्षेत्रास अधीन राहून इतर कोणत्याही शहरात किंवा जागेत, [३][ त्या त्या वेळी अंमलात असलेल्या विधीअन्वये नगरपालिकेमध्ये ] ज्यारीतीने खर्च निश्चित केले जातात व वसूल केले जातात त्याच रीतीने निश्चित केली जाईल व वसूल केली जाईल आणि [२][ मुंबई येथील उच्च न्यायाधिकरणाच्या ] अधिकारक्षेत्रात नसणाऱ्या कोणत्याही शहरात किंवा जागेत या अधिनियमान्वये ज्यारीतीने नुकसानभरपाई वसूल केली जाते त्याचरीतीने वसूल केली जाईल.

व्यक्तीस (रस्ता इ.) पूर्वावस्थेत आणण्याचा व खर्च वसूल करण्याचा अधिकार असणे. खर्च कसे निश्चित करावयाचे आणि वसूल करावयाचे ते.

वापरलेल्या गॅसचे प्रमाण निश्चित करण्यासाठी इमारतीत प्रवेश करण्याचा अधिकार.

८. उक्त कंपनीने, त्या कारणांसाठी योग्यरीतीने नेमलेला कारकून, वास्तुविद्याविशारद किंवा इतर अधिकारी यास, गॅसच्या पुरवठ्याचे नियमन करण्यासाठी आणि वापरलेल्या किंवा पुरवठा केलेल्या गॅसचे प्रमाण निश्चित करण्यासाठी असलेली मोजमापयंत्रे, जोडकामे आणि कामे यांची तपासणी करण्यासाठी उक्त कंपनीने गॅसचा पुरवठा करून ज्या इमारतीत किंवा जागेत दिवाबत्ती केली आहे अशा कोणत्याही इमारतीत किंवा जागेत, सर्व वाजवी वेळी, प्रवेश करण्याचा अधिकार आहे ;

जो कोणताही इसम अशा अधिकाऱ्यास कोणत्याही वाजवी वेळी, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रवेश करण्यात आणि वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे तपासणी करण्यात अडथळा निर्माण करील तर त्याने, अशा प्रत्येक अपराधादाखल, उक्त कंपनीकडे, पराकाष्टा पन्नास रुपये जमा केले पाहिजेत.

९. [ गॅसबद्दल येणे असलेल्या भाड्याची वसुली.] हे कलम सन १९५० चा मुंबई अधिनियम १३, कलम ८ या अन्वये रद्द करण्यात आले.

१०. [ गॅसचा पुरवठा थांबविण्यात येईल तेव्हा नलिका काढण्याचा अधिकार.] हे कलम सन १९५० चा मुंबई अधिनियम १३, कलम ८ या अन्वये रद्द करण्यात आले.

वसूल होणे असलेल्या भाड्याबद्दल मापयंत्रे वगैरे जप्त न करणे.

११. उक्त कंपनीने भाड्याने दिलेली कोणतीही नलिका, मापयंत्र, जोडकामे किंवा इतर उपकरणे ही, येणे असलेले भाडे किंवा महसूल याबद्दल किंवा त्यांचा ज्या जागेत उपयोग होत आहे अशा जागेबाबत कोणताही दर किंवा कर येणे असल्यास त्याबाबत जप्त केली जाणार नाहीत किंवा ती उपकरणे त्याच्या ताब्यात आहेत किंवा ज्याच्या अधिकारात आहेत अशा इसमाविरुद्ध कोणत्याही न्यायालयाच्या आदेशिकांची अंमलबजावणी करताना किंवा त्यास नादार किंवा दिवाळखोर ठरविण्याबाबतच्या कोणत्याही कामकाजात किंवा त्याअन्वये जप्त केली जाणार नाहीत.

---

१. सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२ याच्या कलम २ चे परंतुक तसेच सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ९, अनुसूची इ द्वारे मूळ मजकूराऐवजी हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

२. निधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सुधारित अधिनियम, १८९५ (सन १८९५ चा १६) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

**लबाडीने गॅसचा उपयोग केल्याबद्दल शास्ती.**

१२. जी व्यक्ती, उक्त कंपनीच्या मालकीच्या कोणत्याही नलिकेस जोडणारा कोणताही नळ तिच्या संमतीशिवाय, बसवील किंवा बसवून घेईल किंवा त्यापासून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे गॅस घेईल अथवा वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे अशा कोणत्याही नलिकेस, मापयंत्रास, जोडकामास किंवा इतर उपकरणास लबाडीने इजा करील किंवा त्यांत ढवळाढवळ करील, अथवा जी व्यक्ती, उक्त कंपनीने पुरवठा केलेला गॅस मापयंत्राने निश्चित ठरविला जात नसेल अशा बाबतीत, उक्त कंपनीने ज्या बर्नरची तरतूद केली असेल किंवा जो बर्नर पसंत केला असेल अशा बर्नरखेरीज इतर बर्नरचा उपयोग करील किंवा ज्या बर्नरच्या उपयोगाबद्दल पैसे देण्याचा त्याने करार केला आहे त्या बर्नरपेक्षा अधिक मोठ्या आकाराच्या बर्नरचा उपयोग करील किंवा त्याने ज्यावेळेपर्यंत दिवे जाळण्याबद्दल करार केला आहे त्या वेळेहून अधिक वेळेपर्यंत दिवे जळत ठेवील किंवा अन्य रीतीने अयोग्यरीत्या गॅस वापरील किंवा जाळील किंवा उक्त कंपनीकडून त्यास पुरविण्यात येणाऱ्या गॅसचा कोणताही भाग इतर कोणत्याही व्यक्तीस पुरवील, अशा प्रत्येक इसमाने, गॅसचा पुरवठा केल्याबद्दल कंपनीस जो पैसा प्रथम देणे आहे त्या पैशासह, उक्त कंपनीकडे, अशा प्रत्येक अपराधादाखल पन्नास रुपये जमा केले पाहिजेत आणि असा अपराध करणे ज्या मुदतीपर्यंत चालू ठेवण्यात आले त्या प्रत्येक दिवसास किंवा असा अपराध किंवा ज्या दिवशी पुन्हा करण्यात येईल अशा प्रत्येक दिवसासाठी वीस रुपये आणखी जमा केले पाहिजेत आणि उक्त कंपनीस अशा रीतीने अपराध करणाऱ्या व्यक्तीच्या घरातून किंवा जागेतून, अशा व्यक्तीबरोबर कंपनीने पूर्वी कोणताही करार केला असला तरीही तिला गॅसचा पुरवठा बंद करण्याचा अधिकार आहे आणि असे करण्याबद्दल उक्त कंपनीविरुद्ध कोणतेही कामकाज किंवा दावा करता येणार नाही.

**नलिकेस जाणूनबुजून नुकसान पोहचविल्याबद्दल शास्ती.**

१३. जी व्यक्ती, उक्त कंपनीची कोणतीही नलिका, खांब, स्तंभ, सांधा (प्लग), दिवा किंवा इतर कामे ही जाणूनबुजून काढील, नष्ट करील किंवा त्यास नुकसान पोहचवील किंवा जी व्यक्ती कोणतेही सार्वजनिक दिवे किंवा केलेली दिवाबत्ती जाणूनबुजून विझवील किंवा उक्त कंपनीने पुरवठा केलेल्या गॅसची जाणूनबुजून उधळपट्टी करील किंवा त्याचा गैररीतीने उपयोग करील अशा प्रत्येक व्यक्तीने, अशा प्रत्येक अपराधादाखल उक्त कंपनीकडे केलेल्या नुकसानीबद्दलच्या रकमेसहित पराकाष्ठा पन्नास रुपये उक्त कंपनीकडे जमा केले पाहिजेत.

**अपघातामुळे नुकसान केलेल्या नलिकेबद्दल मोबदला.**

१४. जी व्यक्ती निष्काळजीपणाने किंवा अपघातामुळे, उक्त कंपनीच्या मालकीची किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असणारी कोणतीही नलिका, खांब किंवा दिवा तोडील, फेकून देईल किंवा त्यास नुकसान पोहोचवील अशा प्रत्येक व्यक्तीने, कोणत्याही फौजदारी न्यायाधीशास वाजवी वाटेल अशा केलेल्या नुकसानीच्या रकमेहून अधिक नसणारी रक्कम मोबदला म्हणून उक्त कंपनीस दिली पाहिजे.

**पाणी दूषित करविल्याबद्दल शास्ती.**

१५. जर उक्त कंपनी कोणत्याही वेळी, गॅस तयार करताना किंवा त्याचा पुरवठा करताना उत्पन्न झालेले घाण द्रव्य किंवा इतर पदार्थ कोणत्याही झऱ्यात, पाण्याच्या टाकीत, नळात, तळ्यात किंवा पाण्याच्या जागेत किंवा त्याला जोडलेल्या कोणत्याही गटारात, वाहू देईल किंवा त्यामध्ये आणवील किंवा अशा कोणत्याही झऱ्यातील, टाकीतील, नळातील, तळ्यातील किंवा पाण्याच्या जागेतील पाणी ज्यामुळे दूषित होईल अशा रीतीने गॅस तयार करण्याच्या किंवा त्याचा पुरवठा करण्याच्या कामाशी संबंधित असे कोणतेही काम जाणूनबुजून करील तर, उक्त कंपनीने, अशा प्रत्येक अपराधादाखल पराकाष्ठा एक हजार रुपये जमा केले पाहिजेत ;

आणि त्यांनी, ज्या दिवशी असे घाण द्रव्य किंवा इतर पदार्थ आणला असेल किंवा वाहू दिला असेल किंवा ज्यामुळे पाणी दूषित होईल असे काम, ज्या व्यक्तीच्या पाण्यात असे घाण द्रव्य किंवा इतर पदार्थ टाकण्यात येईल किंवा वाहू देण्यात येईल किंवा त्यामुळे ज्याचे पाणी दूषित होईल अशा व्यक्तीने अपराधाबद्दलची नोटीस उक्त कंपनीवर बजाविल्यापासून चोवीस तासांची मुदत संपल्यानंतर चालू राहील त्या प्रत्येक दिवसासाठी, आणखी पराकाष्ठा पाचशे रुपये जमा केले पाहिजेत. अपराध चालू असताना प्रत्येक दिवसासाठी शास्ती.

१६. उक्त कंपनीने घातलेल्या किंवा बसविलेल्या किंवा तिच्या मालकीच्या कोणत्याही नलिकेतून जेव्हा कोणताही गॅस जाऊ देण्यात येईल तेव्हा तिने, त्याबद्दल लेखी नोटीस मिळाल्यानंतर असा गॅस जाऊ देण्यास ताबडतोब प्रतिबंध केला पाहिजे आणि अशी नोटीस मिळाल्यानंतर चोवीस तासांच्या आत उक्त कंपनीने गॅस जाऊ देण्यावर परिणामकारक प्रतिबंध केला नाही आणि तक्रारीचे कारण संपूर्णतः नष्ट केले नाही तर तिने अशा प्रत्येक अपराधादाखल, अशी नोटीस बजाविल्यापासून चोवीस तासांची मुदत संपल्यानंतर ज्या दिवशी असा गॅस जाऊ देण्यात येईल अशा प्रत्येक दिवसासाठी पन्नास रुपये जमा केले पाहिजेत. नोटीस दिल्यानंतर गॅस जाऊ दिल्याबद्दल त्या प्रत्येक दिवसासाठी शास्ती.

१७. उक्त कंपनीच्या गॅसमुळे कोणतेही पाणी जेव्हा दूषित होईल तेव्हा तिने, अशा रीतीने जिचे पाणी दूषित होईल त्या व्यक्तीकडे, अशा प्रत्येक अपराधादाखल, पराकाष्ठा पाचशे रुपये आणि अशा अपराधाबद्दलची नोटीस बजाविल्यापासून चोवीस तासांची मुदत संपल्यानंतर असा अपराध ज्या दिवशी चालू राहील त्या प्रत्येक दिवसासाठी पराकाष्ठा शंभर रुपये आणखी जमा केले पाहिजेत. जर गॅसमुळे पाणी दूषित झाले तर त्याबद्दल शास्ती.

१८. उक्त कंपनीच्या गॅसमुळे असे पाणी दूषित होत आहे किंवा कसे हे निश्चित करण्याच्या कारणासाठी, जे पाणी दूषित होत असल्याचे समजण्यात येत असेल असे पाणी जिच्या मालकीचे आहे अशा व्यक्तीस जमीन खणण्याचा आणि उक्त कंपनीच्या नलिका, नळ व कामे यांची तपासणी करण्याचा अधिकार आहे. परंतु, अशा व्यक्तीने, असे खोदकाम आणि तपासणी करण्यास सुरुवात करण्यापूर्वी ज्यावेळी असे खोदकाम व तपासणी करण्याचा इरादा असेल त्या वेळेबद्दलची उक्त कंपनीस, चोवीस तासांची लेखी नोटीस दिली पाहिजे आणि असे खोदकाम ज्या ठिकाणी होणार आहे तेथील रस्ता, फरशी किंवा जागा यावर नियंत्रण असणाऱ्या किंवा त्याची व्यवस्था पाहणाऱ्या व्यक्तीस तशाच प्रकारची नोटीस दिली पाहिजे आणि ते, उक्त रस्ता किंवा फरशी पूर्वावस्थेत आणण्याच्या उक्त कंपनीने नलिका बसविण्याच्या कारणासाठी तिने तोडलेले रस्ते किंवा फरश्या यांच्याबाबतीत यापूर्वी जबाबदारीची जी तरतूद करण्यात आली असेल त्या जबाबदारीस अधीन असतील आणि विलंब लावल्याबद्दल किंवा जी कोणतीही गोष्ट करणे भाग आहे अशी गोष्ट न केल्याबद्दल किंवा ती गोष्ट गैररीतीने केल्याबद्दल उक्त कंपनी ज्या शास्तीस पात्र ठरेल त्या शास्तींच्या ते अधीन असतील आणि आणखी असे की कंपनीच्यावतीने काम करणारे अधिकारी किंवा इतर व्यक्ती यांस वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे असे खोदकाम करण्याचे किंवा तपासणीचे काम चालू असताना हजर राहण्याचा अधिकार आहे. पाणी दूषित झाल्याचे कारण निश्चित करण्यासाठी गॅसच्या नलिकांची तपासणी करण्याचा अधिकार.

खर्च कुणी करावयाचा.

१९. जर अशा कोणत्याही तपासणीनंतर, असे पाणी उक्त कंपनीच्या मालकीच्या कोणत्याही गॅसमुळे दूषित झाल्याचे आढळून येईल तर, असा खोदकाम करण्याचा, तपासणीचा आणि अशा तपासणीमध्ये खराब झालेल्या सडकेच्या किंवा जागेच्या दुरुस्तीचा खर्च उक्त कंपनीने दिला पाहिजे, परंतु, अशा तपासणीनंतर, असे पाणी उक्त कंपनीच्या मालकीच्या कोणत्याही गॅसमुळे दूषित झाले नसल्याचे आढळून येईल तर, अशी तपासणी करविणाऱ्या व्यक्तीने असा सर्व खर्च दिला पाहिजे आणि तसेच अशा तपासणीमुळे उक्त कंपनीच्या कामास जे कोणतेही नुकसान होईल ते नुकसान उक्त कंपनीस भरून दिले पाहिजे.

खर्च कसा निश्चित करावयाचा.

२०. अशा प्रत्येक तपासणीच्या आणि दुरुस्तीबद्दलच्या खर्चाची आणि उक्त कंपनीस झालेल्या नुकसानीची रक्कम ही, त्याबद्दल कोणताही वाद उत्पन्न झाल्याचे बाबतीत, ती निश्चित करण्याच्या आणि वसूल करण्याच्या खर्चासहित, खर्च निश्चित करण्यासाठी आणि त्याच्या वसुलीसाठी कलम ७ मध्ये जी रीत विहित केली असेल त्याच रीतीने निश्चित केली पाहिजे आणि वसूल केली पाहिजे.
* * * * *[१]

उपद्रवाबद्दलच्या आरोपास जबाबदार ठरविणे.

२१. ह्या अधिनियमातील कोणत्याही मजकुरामुळे, उक्त कंपनीस उपद्रवाबद्दल जबाबदार धरण्यास किंवा गॅस तयार करण्यामुळे किंवा त्याचा पुरवठा करण्यामुळे कंपनी ज्या इतर कोणत्याही वैध कार्यवाहीस पात्र ठरविण्यात येऊ शकते अशी कोणतीही वैध कार्यवाही करण्यास प्रतिबंध होतो असे समजता कामा नये.

ज्ञापन आणि संघ नियमावली आणि विनियम इ. च्या प्रती, तपासणीसाठी मुंबईतील कंपनीच्या कार्यालयात, सचिवालयात आणि जॉईंट स्टॉक कंपन्यांच्या व्यक्ती रजिस्ट्रारच्या कार्यालयात ठेवणे.

२२. उक्त कंपनीचे ज्ञापन आणि संघ नियमावली यांच्या आणि उक्त कंपनीचे विनियम म्हणून असलेले उक्त जॉईंट स्टॉक कंपनी अधिनियम, १८५६ व १८५७ या अन्वये नोंदणी केलेल्या इतर प्रत्येक लेखाच्या प्रती आणि उक्त कंपनीच्या विनिमयात कंपनीच्या सर्वसाधारण सभेच्या ज्या कोणत्याही ठरावामुळे कोणताही बदल केला असेल किंवा बदल करणे असेल अशा प्रत्येक विशेष ठरावाची प्रत उक्त कंपनीच्या [२][ बृहन्मुंबईतील ] कार्यालयात ठेवली पाहिजे आणि त्या (प्रती), उक्त कार्यालयात नेहमीच्या कामाच्या वेळेत, सर्व व्यक्तींच्या तपासणीसाठी, ठेवण्यात आल्या पाहिजेत ; आणि उक्त कंपनीने हा अधिनियम संमत झाल्यानंतर शक्यतो लवकर, किंवा, यानंतर जो कोणताही ठराव केला जाईल असा कोणताही विशेष ठराव करण्यात आल्यानंतर, असे ज्ञापन व संघ नियमावली आणि इतर प्रत्येक असा लेख यांच्या वर निर्दिष्ट केल्या प्रमाणेच्या प्रत्येक विशेष ठरावाच्या प्रती, मुंबई सचिवालयात आणि तसेच जॉईंट स्टॉक कंपनीच्या रजिस्ट्राराच्या कार्यालयात किंवा असा अधिकारी नसेल तर, मुंबई येथील न्यायाधिकरणाचे कागदपत्र ज्या व्यक्तीचे अभिरक्षेत असतील त्या व्यक्तीच्या कार्यालयात ठेवल्या पाहिजेत आणि त्या त्या ठिकाणी दाखल केल्या जातील.

---

१. मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) अनुसूची बी द्वारे हा मजकूर निरसित करण्यात आला. ही अनुसूची, मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई १) चे परिशिष्ट म्हणून छापण्यात आली.

२. सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७ याचे कलम ९ तसेच सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२ याच्या कलम २ चे परंतुक याद्वारे मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

जॉईंट स्टॉक कंपनीच्या रजिस्ट्रारने किंवा उक्त उच्च न्यायालयाचे कागदपत्र ज्याचे अभिरक्षेत असतील त्या व्यक्तीने प्रमाणित केलेली व त्यावर त्याने सही केलेली, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे अशा कोणत्याही कार्यालयात दाखल केलेल्या प्रतीची तपासणी झालेली प्रत ही, मुंबई इलाख्याच्या सर्व प्रदेशात किंवा मुंबई इलाख्याच्या अधीन असणाऱ्या सर्व प्रदेशात कोणत्याही न्यायालयात, मग असे न्यायालय रॉयल चार्टरने स्थापण्यात आलेले असो किंवा नसो, कोणत्याही फौजदारी न्यायाधिशासमोर किंवा महसूल अधिकाऱ्यासमोर किंवा इतर अधिकाऱ्यासमोर, आणि मग तो न्यायदान करण्याचे काम करीत असो किंवा न्यायिक चौकशीच्या पूर्वीचे कोणतेही कामकाज करीत असो; चालविण्यात येणाऱ्या सर्व कामात, दाव्यात आणि कोणत्याही कामकाजात, मग ते दिवाणी स्वरूपाचे किंवा फौजदारी स्वरूपाचे असो, असे ज्ञापन किंवा संघ नियमावली, लेख किंवा विशेष ठराव याबाबत योग्य आणि पुरेसा पुरावा आहे असे समजले पाहिजे. प्रत पुरावा म्हणून समजणे.

२३. ज्या कोणत्याही मधल्या अवधीतील आदेशिका व इतर आदेशिका आणि इतर कोणत्याही प्रकारच्या नोटिसा यामुळे उक्त कंपनीस दावा करता येईल किंवा तिच्यावर दावा करता येईल व ज्या विधीस अनुसरून किंवा न्यायालयाच्या प्रथेस अनुसरून उक्त कंपनीवर कोणत्याही कारणांसाठी बजाविणे किंवा देणे आवश्यक आहेत अशा सर्व मधल्या अवधीतील आदेशिका व इतर आदेशिका आणि कोणत्याही नोटिसा या ज्या मार्गांनी किंवा साधनांनी अन्यथा वैधरीतीने बजाविता किंवा देता येतील असे सर्व मार्ग व साधने यांचा उपयोग करून त्या उक्त कंपनीच्या मुंबई येथील कार्यालयात, उक्त कंपनीच्या व्यवस्थापक अभिकर्त्याच्या नावे लिहून बजाविण्याचा किंवा देण्याचा अधिकार आहे किंवा त्या बजाविता किंवा देता येतील. कंपनीवर आदेशिका बजाविणे.

२४. या अधिनियमान्वये बसविण्यात आलेल्या दंडाच्या रकमा व सरकारजमा करावयाच्या रकमा आणि ज्यांच्या वसुलीसाठी याठिकाणी पूर्वी विशेष तरतूद करण्यात आली नाही अशा कोणत्याही नुकसानीदाखलच्या व खर्चाच्या रकमा ह्या, अनुक्रमे फौजदारी न्यायाधीशापुढे संक्षिप्त चौकशी करून पन्नास रुपये पर्यंत वसूल करण्याचा अधिकार आहे. दंड वगैरेची वसुली.

२५. ह्या अधिनियमान्वये देणे आहेत असे ज्यांच्याबाबत ठरविण्यात आले आहे अशा सर्व दंडाच्या रकमा, सरकारजमा करावयाच्या रकमा, नुकसानीदाखलच्या व खर्चाच्या रकमा, जर त्या अन्यथा देण्यात आल्या नसतील तर, त्या देण्यास जबाबदार असणाऱ्या पक्षकाराचा माल व चीजवस्तू जप्त करून आणि त्या विकून वसूल करण्याचा अधिकार आहे आणि असा माल व चीजवस्तू यापासून मिळालेला पैसा, अशी जप्ती व विक्री यासाठी आलेला खर्च वजा करून जी कोणतीही रक्कम शिल्लक राहील ती, हा ज्याचा माल जप्त केला असेल त्या पक्षकाराने मागणी केल्यानंतर त्यास परत केली पाहिजे किंवा अशा रीतीने माल जप्त करून तो विकण्याऐवजी किंवा ह्या अधिनियमाच्या तरतुदीन्वये बसविण्यात आलेला दंड, सरकारजमा करावयाची रक्कम, नुकसानीदाखलची रक्कम किंवा आलेला खर्च यांची संपूर्ण रक्कम किंवा त्याचा कोणताही भाग हा, माल जप्त करून न मिळाला तर, असा दंड, सरकारजमा करावयाची रक्कम, नुकसानीदाखलची रक्कम किंवा खर्चाची रक्कम याबाबत दावा करणाऱ्या व्यक्तीस, ती देण्यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीवर, सक्षम क्षेत्राधिकार असणाऱ्या कोणत्याही न्यायालयात दावा करण्याचा अधिकार आहे. जप्ती करून रक्कम वसूल करणे.

कोणतीही जप्ती नमुना वगैरे प्रमाणे नाही म्हणून ती अवैध ठरणार नाही.

२६. आज्ञापत्रात, दोषसिद्धीच्या निकालपत्रात, जप्तीच्या अधिपत्रात किंवा जप्तीसंबंधातील कामकाजात कोणतीही उणीव राहिल्याबद्दल किंवा ते नमुन्याप्रमाणे नसल्याबद्दल ह्या अधिनियमामुळे करण्यात आलेली कोणतीही जप्ती अवैध ठरते असे समजता कामा नये किंवा जप्ती करणारी कोणतीही व्यक्ती ही अतिक्रमण करीत आहे असे समजता कामा नये किंवा असा कोणताही पक्षकार हा, त्याने त्यानंतर केलेल्या कोणत्याही नियमबाह्यतेबद्दल प्रथमतः अतिक्रमण करणारा म्हणून समजता कामा नये, परंतु अशा नियमबाह्यतेमुळे आपले नुकसान झाले आहे असे समजणाऱ्या सर्व व्यक्तींस सक्षम क्षेत्राधिकार असणाऱ्या कोणत्याही न्यायालयात अशा विशेष नुकसानीबद्दल पूर्ण मोबदला वसूल करण्याचा अधिकार आहे.

अधिनियम, इतर जागास व कंपनीस लागू करण्याचा अधिकार.

२७. [१][ [२][राज्य] शासनाने][३][ राजपत्रात ] प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या आदेशाद्वारे [४][ मुंबई राज्यातील ] इतर कोणत्याही शहरास किंवा जागेस आणि तसेच जी कंपनी गॅस तयार करण्याच्या व त्याचा पुरवठा करण्याच्या कारणासाठी यानंतर स्थापण्यात येईल आणि जी विधीस अनुसरून संपूर्णतः नोंदण्यात आली आहे अशा इतर कोणत्याही जॉईंट स्टॉक कंपनीस ह्या अधिनियमाचे उपबंध लागू करणे हे विधिसंमत असेल.

अर्थ विवरण.

२८. ह्या अधिनियमात वापरलेल्या पुढील शब्दाचा व शब्दप्रयोगाचा अर्थ, विषयावरून किंवा संदर्भावरून अशा वाक्यरचनेत त्याच्याविरुद्ध अर्थ होत नसेल तर त्यांना याअन्वये जो अर्थ देण्यात आला आहे तोच अर्थ असेल.

[५]* * * * * * * *

''सडक'' या शब्दात कोणताही जाण्यायेण्याचा सार्वजनिक मार्ग किंवा ठिकाण, आणि कोणताही रस्ता, चौक, प्रांगण, आळी, राजमार्ग, गल्ली, बोळ किंवा मार्ग यांचा समावेश होतो--मग तो त्यावरून जाण्यायेण्याचा लोकांना हक्क असेल असा रहदारीचा रस्ता असो किंवा नसो--आणि तसेच या संज्ञेत कोणत्याही सार्वजनिक किंवा रेल्वेच्या पुलापरील रस्ता किंवा कॉज-वे यांचा आणि त्याजकडे जाण्यायेण्याचा मार्ग यांचा समावेश होतो.

[६]* * * * *

[७]* * * * *

---

१. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.
२. विधि अनुकूलन आदेश १९५० द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.
३. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.
४. सन १९५८ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ५१ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.
५. हा मजकूर मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८८६ (१८८६ चा मुंबई ३) अनुसूची बी द्वारे निरसित करण्यात आला. ही अनुसूची मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई १) चे परिशिष्ट म्हणून छापण्यात आली.
६. वरील अधिनियमाद्वारे हा मजकूर निरसित करण्यात आला.
७. सन १९४५ चा मुंबई अधिनियम, १९४५ याच्या कलम ९, अनुसूची इ द्वारे तसेच सन १९४७ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ५२ याच्या कलम २ च्या परंतुकाद्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

---

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६.